मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
(बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)
ठाणे महानगरपालिका मंडई इमारत, खेवरा सर्कल, मानपाडा,
ग्लॅडी अल्वारीस रस्ता, ठाणे (पश्चिम)-४०० ६१०.
दुरध्वनी क्र.०२२-२५८४३९००, ई-मेल-thane@sra.gov.in

751

क्र.मुंमप्र झोपुप्रा/अजि.स.प्रा.ठा.क्र.३/३३-३८ आदेश/काबि ४४/२०२२ दिनांक : १५/१२/२०२२

वाचले :-

१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम १२, ३३ व ३८

२) मुख्य प्रवर्तक, वास्तुविशारद व विकासक मे.प्रणव इंटरप्रायझेस यांचे दि. ०९/०६/२०२२ रोजीचे पत्र.

३) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, दि.२६ एप्रिल २०१८

४) मुंबई महानगर प्रदेश, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण परिपत्रक क्र.१७ जा.क्र.मुंमप्र.झोपुप्रा/परिपत्रक/१९/२०२१, दि.२८/०५/२०२१

५) सहा.आयुक्त, कळवा प्रभाग समिती ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्याकडील पत्र क्र. जा.क्र. ठामपा/कप्रस/सहा.आ-३३१, दि.०८/१२/२०२२.

---

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ अन्वये आदेश**

१) प्रभाकर गजानन सावंत (मुख्य प्रवर्तक)
शिवआनंद सह.गृह.नि.संस्था (मर्या.)
२) मे. प्रणव एंटरप्रायझेस, विकासक
४७/१९९७ एस.एच.बी. कॉलनी,
वर्तकनगर, ठाणे (प)-४०० ६०५
३) उल्हास ग. प्रधान (वास्तुविशारद)
शिवआनंद सह.गृह.नि.संस्था (मर्या.)

— **अर्जदार**

**विरूद्ध**

१) भगवान मंगल्या केणी - परि-२ अ.क्र.४, झो.क्र. ४, - अपात्र.
२) विक्रांत गणपत केणी (गणपत मंगल्या केणी - मयत)
परि-२ अ.क्र. ३१, झो.क्र. ५१, - निवासी - अपात्र
३) भगवान मंगल्या केणी - परि-२ अ.क्र. ३७, झो.क्र. ५७, - अपात्र.
४) भगवान मंगल्या केणी - परि-२ अ.क्र. ४३, झो.क्र. ६३, - निवासी - अपात्र.
५) भगवान मंगल्या केणी - परि-२ अ.क्र. ४४, झो.क्र. ६४, - अनिवासी - अपात्र.
६) राजेंद्र बिश्वनाथ सलागरे - परि-२ अ.क्र. ४५, झो.क्र. ६५, - निवासी - अपात्र

— **सामनेवाला**

मारूती नगर, आई नगर जवळ,
कळवा, ठाणे (प). - ४०००० ५

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

मौजे कळवा, ता.जि. ठाणे येथील सर्वे नं. ३७८ (पै) सि.टी.एस.नं १३३३ (पै) १४०३.१७ चौ.मी. या भूखंडावर शिवआनंद सहकारी गृहनिर्माण संस्थेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असून मे. प्रणव एंटरप्रायझेस या विकासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस सहकार्य न करणाऱ्या एकूण ०६ अपात्र झोपडीधारकांविरूध्द मुख्य प्रवर्तक, वास्तुविशारद व विकासक मे.प्रणव इंटरप्रायझेस यांनी एकत्रितरित्या दि. ०९/०६/२०२२ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ अन्वये कारवाई करणेकामी प्रस्ताव सादर केला आहे. शिवआनंद सह.गृह.नि.संस्था (मर्या.) चे एकूण ५२ झोपडीधारकांचे परिशिष्ट-२ (अंतिम यादी) दि.१९/०५/२०२१ रोजी पारित करण्यात आलेले आहे. सदर परिशिष्ठात सामनेवाला यांच्या नावापुढे पुढीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

| अ.क्र. | झो. क्र. | झोपडीधारकांचे नाव | निवासी / अनिवासी | पात्र / अपात्र | संमती होय/नाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | श्री. भगवान मंगळया केणी | ------ | अपात्र | | झोपडी वास्तव्याचे कागदपत्रे सादर केलेले नाहीत. |
| २ | ५१ | श्री. विक्रांत गणपत केणी (गणपत मंगळया केणी मयत) | निवासी | अपात्र | होय | स्थळ पाहणी वेळी वास्तव्य आढळून आले नाही. तसेच दि.०१/०१/२००० पुर्वीचे वास्तव्याचे पुरावे नाहीत. |
| ३ | ५७ | श्री. भगवान मंगळया केणी | | अपात्र | | दि.०१/०१/२००० पुर्वीपासून झोपडी व वास्तव्याचे कागदपत्रे सादर कलेले नाही. |
| ४ | ६३ | श्री. भगवान मंगळया केणी | निवासी | अपात्र | | दि.०१/०१/२००० पुर्वीपासून झोपडी व वास्तव्याचे कागदपत्रे सादर कलेले नाही. |
| ५ | ६४ | श्री. भगवान मंगळया केणी | अनिवासी (गॅरेज) | अपात्र | | दि.०१/०१/२००० पुर्वीपासून झोपडी व वास्तव्याचे कागदपत्रे सादर कलेले नाही. |
| ६ | ६५ | राजेंद्र विश्वनाथ सलागरे | निवासी | अपात्र | | झोपडी बंद. कागदपत्रे सादर केलेले नाहीत |

अर्जदार यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची छाननी व अवलोकन केले असता प्रकरणी खालीलप्रमाणे सद्यस्थिती दिसुन येते.

१. मौजे कळवा, ता.जि. ठाणे येथील सर्वे नं. ३७८ (पै) सि.टी.एस.नं. १३३३ (पै) हे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, क्र. १७, दि. ३ मे २०१९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित झाले आहे. या मिळकतीवर शिवआनंद सह.गृह.नि.संस्था (मर्या.) करीता झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकामी मे.प्रणव एंटरप्रायझेस हे विकासक असून त्यांना अभियांत्रिकी विभाग, मुंबई महानगर प्रदेश, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांचेकडून सदरच्या योजनेस आशयपत्र L.O.I. क्र. MMRSRA/ ENG/०१९/Sec-८/ST GOVT/ L.O.I., दि.३०/०३/२०२२ रोजी देण्यात आलेले आहे.

२. विकासक मे. प्रणव एंटरप्रायझेस यांनी सामनेवाले यांना झोपडी रिकामी करून झोपडीखालील मोकळ्या जमिनीचा ताबा विकासकास विकास कामासाठी उपलब्ध करून देणेबाबत दि.०७/०५/२०२२, दि.३०/०५/२०२२ व दि.०३/०७/२०२२ रोजी नोटीसा काढून त्याची भारतीय टपाल

विभागामार्फत बजावणी केली असल्याची पोहच सोबत सादर केली आहे. मात्र सामनेवाले यांनी सदर नोटीसीला प्रतिसाद दिला नाही. प्रकरणी अर्जदार मे. प्रणव एंटरप्रायझेस यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ अन्वये प्रतिवादी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. (753)

यास्तव झोपडी रिकामी करून झोपडीखालील मोकळ्या जमिनीचा ताबा विकासकास विकास कामांसाठी उपलब्ध करून देणेस तयार नसल्यास त्यांची पुराव्यासह कारणे समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधी अथवा वकील यांचेमार्फत सादर करणेकरीता या कार्यालयाकडून सामनेवाले यांना दि.२६/०७/२०२२ रोजी नोटीसा काढून बजावण्यात आल्या.

उक्त नोटीसच्या अनुषंगाने दोन्ही पक्षकारांची सुनावणी घेण्यात आली. सुनावणी बाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) नोटीसच्या अनुषंगाने दि.०५/०८/२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीसाठी शिवआनंद सह.गृह.नि.संस्था (मर्या.) च्या वतीने श्री.प्रकाश निवृत्ती चव्हाण (सल्लागार), तसेच संस्थेच्या विकासकाचे प्रतिनिधी म्हणून श्री. शिवाजी पाटील हे उपस्थित होते. व सामनेवाला श्री.भगवान मंगळ्या केणी स्वत: हजर होते. यांनी वरील संदर्भिय नोटिसीस निवासी नं. १, ३, ४, ५ स्वत:साठी व २ चे प्रतिनिधी म्हणून लेखी व तोंडी म्हणणे सादर केले. तसेच सामनेवाले यांनी श्री. विक्रांत गणपत केणी यांना हजर करण्यासाठी मुदतीची मागणी केलेवरून दि.१६/०९/२०२२ रोजी पुढील सुनावणीची तारीख ठेवण्यात आली होती.

२) त्याचप्रमाणे पुढील सुनावणी दि.१६/०९/२०२२ रोजी घेण्यात आली. सुनावणीसाठी संस्थेचे श्री.प्रभाकर गजानन सावंत (मुख्य प्रवर्तक), श्री. प्रकाश निवृत्ती चव्हाण (सल्लागार), तसेच संस्थेच्या विकासकाचे प्रतिनिधी म्हणून श्री. शिवाजी पाटील हे उपस्थित होते व त्यांनी आपले लेखी म्हणणे टपालामार्फत दि.१९/०९/२०२२ रोजी दाखल केले आहे. तसेच सामनेवाला श्री. भगवान मंगळ्या केणी हजर होते व त्यांनी सुनावणी दरम्यान निवासी नं. १ ते ५ झोपडीधारकांच्या वतीने लेखी म्हणणे दाखल केले व सामनेवाला क्र. २ श्री. विक्रांत गणपत केणी वैद्यकीय कारणास्तव सुनावणीस उपस्थित राहण्यास सक्षम नसल्याबाबत प्रमाणपत्र दाखल केले. सामनेवाला क्र.६ यांना खोली बंद असल्याने दारावर नोटीस लावून नोटीस बजावणी होऊनही त्यांनी प्रत्यक्ष वा प्रतिनीधीद्वारे म्हणणे दाखल केले नाही.

**विकासकाचे म्हणणे :-**

विकासकाने आपले लेखी म्हणणे टपालामार्फत दि.१९/०९/२०२२ रोजी दाखल केले आहे. सदर प्रस्तावात ६ झोपड्या ह्या अपात्र असून त्यावर लवकरात लवकर योग्य तो निर्णय घेऊन आम्हाला सदर सोसायटीच्या जागेवर विकास करण्यासाठी जागा मोकळी करून देण्यासंदर्भात योग्य न्याय मिळून तो प्रोजेक्ट लवकर मार्गी लावण्यासाठी मदत व्हावी तसेच ३३ व ३८ या कार्यवाहीवर विचार करून योग्य ते सहकार्य करण्याची विनंती केली आहे. पोस्टाद्वारे नोटीस पाठविण्यात आली आहे तथापी, सामनेवाला यांनी ती स्विकारली नाही असे अर्जात नमूद केले आहे.

**संस्थेचे म्हणणे :-**

शिवआनंद सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.) चे श्री. प्रकाश निवृत्ती चव्हाण (सल्लागार) यांनी म्हणणे मांडले की, भाडेकरूंविरूद्धचे दिवाणी कोर्टातील दावे मागे घेण्याच्या अटीवर श्री. भगवान मंगळ्या केणी यांना १,००,०००/- रू. देण्याचे व विकास झाल्यानंतर ३ लाख रूपये देण्याचे मंजूर झालेले आहे. तसेच अध्यक्ष श्री. गजानन प्रभाकर सावंत यांनी म्हणणे मांडले की, आमची सोसायटी ही केवळ शासकीय सर्व्हे क्र. ३७८ वर आहे. त्यात कोणतीही खाजगी जमीन नाही तरी संबंधितांनी काही आक्षेप घेऊ नये व झोपडपट्टी पुनर्वसन योजना लवकरात लवकर पूर्णत्वास जाण्याच्या दृष्टीकोनातून सामनेवाले यांच्या झोपड्या निष्कासित करून मिळाव्यात अशी संस्थेने तोंडी विनंती केली आहे.

**सामनेवाले यांचे म्हणणे :-**

श्री. भगवान मंगळ्या केणी व इतर ५ यांच्या वतीने दिलेल्या लेखी निवेदनामध्ये खालील मुद्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) मा. सक्षम अधिकारी यांना संबंधितांविरूद्ध महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम २२ (२) नुसार दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० अंतर्गत दावा दाखल करण्याची परवानगी मागितलेली आहे.

२) झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू होण्यापूर्वी दि. १७/०३/२०१६ पूर्वी निवासी श्री. भगवान मंगळ्या केणी व त्यांच्या कुटुंबियांनी एकूण ५३ भाडेकरूंविरूद्ध थकीत भाडे व त्यांच्या ताब्यातील खोल्यांचा कब्जा मिळणेबाबत दिवाणी दावे दाखल केले होते. परंतू शिवआनंद सह.गृह.नि.संस्थेच्या पदाधिकारी यांनी कोर्टासमोर थकीत भाडे तीन लाख रूपये तीन हप्त्यांमध्ये देण्याचे नक्की करून देखील आजपर्यंत थकीत भाडे दिलेले नाही.

३) मे. प्रणव एंटरप्रायझेस यांची विकासक म्हणून केलेली नेमणूक ही बेकायदेशीर असल्याने श्री.भगवान मंगळ्या केणी यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, मुंबई महानगर प्रदेश, झो.पु.प्रा., ठाणे यांनी दि. २६/०४/२०२२ रोजी दिलेल्या आदेशाविरूद्ध मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (सी.ई.ओ.), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे यांच्याकडे अपिल केलेले असून मा. सहा. निबंधक, सहकारी संस्था यांचा निर्णय रद्द करण्याची मागणी केलेली आहे, तसेच सदर शिवआनंद सह.गृह.नि.संस्था यांनी त्यांची सन २०१२ मध्ये विकासक म्हणून केलेली नेमणूक कायदेशीर ठरवावी व सदर प्रकरणी कोर्टाकडून निकाल लागेपर्यंत मे. प्रणव एंटरप्रायझेस व शिवआनंद सह.गृह.नि.संस्था यांच्या विरुद्ध प्रतिबंधात्मक मनाई आदेश देण्याची विनंती केली आहे.

४) मे. प्रणव एंटरप्रायझेस विकासक यांच्या नेमणूकीबाबतचा आणि महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम २२ (२) ची परवानगी मिळेपर्यंत सक्षम अधिकारी व दिवाणी न्यायालयाकडून अंतिम निर्णय होईपर्यंत कार्यवाही स्थगित ठेवण्याची विनंती केली आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ च्या अंतर्गत कारवाईच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना आपली बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात आलेली आहे. अधिकचे म्हणणे नाही असे दोन्ही पक्षकारांनी नमूद केल्यावर प्रकरण निर्णयासाठी बंद करण्यात आले. तथापी, सदरचे बांधकाम अनधिकृत असल्याची खात्री करण्यासाठी कळवा प्रभाग समिती यांना दि.०७/१०/२०२२ रोजी पत्र दिले असता त्यांनी त्यांचेकडील पत्र दि.०८/१२/२०२२ नुसार सदरचे बांधकाम अधिकृत दिसून येत नसल्याचे कळविले आहे.

अर्जदार, सामनेवाले यांचे म्हणणे व प्रकरणी दाखल अभिलेखाचे अवलोकन केले असता खालील वस्तूस्थिती स्पष्ट होते.

७५५

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., ठाणे यांनी क्र. झोपुप्रा/उजि.स.प्रा.क्र.३/३क(१)/कळवा/शिवआनंद सह.गृह.नि.संस्था(नि.)/एस.आर.नं.०१/२०१९, दि.३ मे २०१९ नुसार सर्वे नं.३७८ (पै) सि.टी.एस.नं.१३३३ (पै) ह्या भूखंडावर १६०००.० चौ.मी. भूखंडापैकी १४०३.१७ चौ.मी. क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले आणि सदर क्षेत्र हे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, क्र.१७, दि.१४ मे २०१९ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून प्रसिद्ध झाले आहे.

२) उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, झो.पु.प्रा. ठाणे ३ यांनी शिवआनंद सह.गृह.नि.संस्था (मर्या.) चे ५२ झोपडीधारकांचे परिशिष्ट २ (अंतिम यादी) दि. १९/०५/२०२१ रोजी पारीत केले आहे व त्यानूसार सामनेवाला अपात्र असल्याचे दिसून येत आहे.

३) अभियांत्रिकी विभाग, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांजकडील सदरच्या योजनेस आशयपत्र L.O.I. क्र.MMRSRA/ ENG/ ०१९/ Sec-८/ STGOVT/ L.O.I., दि.३०/०३/२०२२ रोजी मान्यता देण्यात आली आहे. तसेच I.O.A. क्र. MMR,SRA/ENG/०४१/Sec-८/STGOVT/AP, दि.३०/०३/२०२२ रोजी देण्यात आला आहे.

४) सहा.आयुक्त, कळवा प्रभाग समिती ठाणे महानगरपालिका, ठाणे यांच्याकडील जा.क्र. ठामपा/कप्रस/सहा.आ-३३१, दि.०८/१२/२०२२ रोजीचे सदरचे बांधकाम अधिकृत नसलेबाबतचे पत्र प्रकरणी दाखल आहे.

५) विकासक मे. प्रणव एंटरप्रायझेस यांनी प्रतिवादी यांना झोपडी रिकामी करून झोपडीखालील मोकळ्या जमिनीचा ताबा विकासकास विकास कामासाठी उपलब्ध करून देणेसाठी दि.०७/०५/२०२२, दि.३०/०५/२०२२ व दि.०३/०७/२०२२ रोजी नोटीसा काढण्यात आल्या असून त्याची भारतीय टपाल विभागामार्फत बजावणी केली असल्याची पोहच सोबत सादर केली आहे.

६) प्रकरणी सुनावणीस उपस्थित सामनेवाले श्री. भगवान मंगळ्या केणी यांनी स्वत: व इतर ५ यांच्या वतीने लेखी म्हणणे मांडले आहे.

७) अंतीम परिशिष्ट -२ नुसार सामनेवाले सर्वच झोपडीधारक हे अपात्र असल्याचे दिसून येत आहेत. तथापि, अद्यापही त्यांनी पात्रतेबाबत रितसर अपील करून अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय प्राप्त करून घेतल्याचे दिसून येत नाही.

८) प्रतिवादी यांची मुळ हरकत ही विकासक नेमणूकीबाबत असून पात्रतेबाबत नाही. तसेच उपरोक्त संस्थेच्या सदस्यांनी भाडे देण्याबाबत आहे. झोपडीवरील आपल्या हक्काबाबत त्यांनी म्हणणे मांडले नाही.

९) सामनेवाला यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम २२ (२) नुसार दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० अंतर्गत दावा दाखल करण्याची परवानगी मागितलेली आहे. तथापी, झोपडीचे निष्कासनाने सदर मागणीत बाधा येणारी नाही.

१०) प्रतिवादी झोपडी खाली करण्यास नकार देत असून एक प्रकारे सदर योजनेच्या अंमलबजावणीस अडथळा निर्माण करत आहेत. त्यामुळे यापूर्वीच झोपडीचा ताबा विकासकास दिलेले उर्वरित पात्र लाभार्थी त्यांना मिळणाऱ्या हक्कापासून वंचित राहत आहेत व त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत

आहे. ५२ झोपडीधारकांपैकी ४२ झोपडीधारकांनी यापूर्वीच आपल्या झोपड्या खाली करून विकासकाच्या ताब्यात दिल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

**निष्कर्ष :-**

वरील वस्तुस्थितीचा विचार करता प्रस्तुत सर्व प्रतिवादी हे सद्य स्थितीत अपात्र आहे याबाबत त्यांनी अपिल करून पात्रतेबाबत सक्षम अधिकाऱ्यांचा अंतिम निर्णय प्राप्त करून घेतलेला दिसून येत नाही. प्रस्तुत प्रकल्पातील ५२ झोपडीधारकांपैकी ४२ झोपडीधारकांनी झोपडीचा ताबा विकासकास दिलेला आहे. प्रकरणी सामनेवाले ६ अपात्र झोपडीधारकांनी ताबा न दिल्यामुळे विकासकास झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीचे काम करण्यास अडथळा निर्माण झाला आहे. सामनेवाले यांचेकडे याबाबत काहीही सबळ कारण दिसून आलेले नाही. त्यांनी उपस्थित केलेले आक्षेप / मुद्दे यासाठी सक्षम न्यायालयाची तरतूद असून त्याबाबत सक्षम न्यायालयात दाद मागणे अपेक्षीत आहे. सर्वच सामनेवाले हे अपात्र असल्याने नियमानुसार त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनावर येत नाही. तरीदेखील त्यांच्या पात्रतेबाबत अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपिल दाखल करण्यास पुर्ण संधी असून या निष्कासन प्रक्रियेमुळे त्यांच्या हक्कास कोणतीही बाधा येणार नाही. त्यांच्या पात्रतेचा निर्णय होईपर्यंत निष्कासन थांबविण्याची कोणतीही आवश्यकता दिसून येत नाही. सामनेवाले यांनी त्यांच्या झोपडीचा ताबा विकासकास न दिल्यामुळे संपूर्ण प्रकल्पाचे काम थांबलेले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मी, प्रभारी उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झो.पु.प्रा., ठाणे-३ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम १२, ३३ व ३८ नुसार पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश :-**

१) वादी / अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी यांनी (सुनावणी दरम्यान व सदर आदेश निर्गमित होण्यापूर्वी ज्या झोपडीधारकांनी/ प्रतिवादींनी आपल्या झोपड्या खाली करून विकासकाच्या ताब्यात दिल्या त्या वगळता) या आदेशाच्या दिनांकापासून ०७ दिवसांत स्वत: झोपडी निष्कासित करावी व झोपडीखालील जागा प्रस्तावित विकास कामासाठी वादी तथा विकासकास उपलब्ध करून द्यावी.

३) प्रतिवादी यांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या मुदतीत सदर आदेशाचे अनुपालन करण्यास कसूर केल्याचे स्पष्ट झाल्यास तदनंतर त्या झोपडीधारकाच्या झोपडीचे बांधकाम महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ अन्वये या कार्यालयामार्फत निष्कासित करण्यात येईल. या कामी शासकीय यंत्रणेस आलेला खर्च संबंधित झोपडीधारकांकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

दिनांक :- १५-१२-२०२२
स्थळ :- ठाणे

उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी झो. पु. प्रा. ठाणे-३ सत्यमेव जयते महाराष्ट्र शासन

९/१२/२०२२

प्रभारी उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
मुंबई महानगर प्रदेश
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे - ३